# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-२९/२०२५ दिनांक- २२/०१/२०२५

## प्रेस नोट

### अनाधिकृतरित्या मिरारोड पोलीस ठाण्याचे हद्दीत वास्तव्यास असलेल्या ०१ पुरुष व ०२ बांगलादेशी महिला नागरिकांवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-मिरा-भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक २१/०१/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष मिरा-भाईंदर यांना बातमीदारा मार्फत मिरारोड पोलीस ठाण्याचे हद्दीतील साईकृष्णा बिल्डींगच्या समोर, सिनेमॅक्स सिनेमा जवळ मिरारोड पुर्व या ठिकाणी बांग्लादेशी नागरीक विनापरवाना कामासाठी येत असल्याची बातमी मिळाली असून ते विनापरवाना राहत असल्याची माहिति मिळाली.

मिळालेल्या बातमीप्रमाणे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन दुभाषीक व दोन पंचासमक्ष वर नमुद ठिकाणी १३.४० वा. ते १४.१५ दरम्यान साफळा रचुन ०१ पुरुष व ०२ महिला असे एकुण ०३ बांगलादेशी नागरीकांना पोलीसांच्या मदतीने ताब्यात घेवुन त्यांचेकडे केलेल्या चौकशीत, ते बांगलादेशी नागरीक असल्याची कबुली दिल्याने सदरबाबत दोन पंचासमक्ष पोउपनिरी/प्रकाश तुपलोंढे यांनी सविस्तर पंचनामा केला असुन ताब्यात घेतलेल्या ०१ पुरुष व ०२ महिला बांगलादेशी नागरीकाविरुध्द मिरारोड पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्रमांक ३०/२०२५ असे एकुण ०३ बांगलादेशी नागरीकाविरुध्द फिर्याद दिल्याने पासपोर्ट (भारतात प्रवेश) अधिनियम १९२० चे कलम ३, ४ सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम १३, १४-अ (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, मा. सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष मिरा-भाईंदर पथकाचे पोनि/देविदास हंडोरे, पोउपनिरी/प्रकाश तुपलोंढे सफौ/उमेश पाटील, सफौ/रामचंद्र पाटील, सफौ/शिवाजी पाटील, पोहवा/किशोर पाटील, पोशि/चेतनसिंग राजपुत, पोशि/केशव शिंदे, चा.पोहवा/सम्राट गावडे सर्व नेमणुक-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर तसेच मपोहवा/१००६३ लतादेवी एक्कलदेवी, नेमणुक अंमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखा, मपोशि/जयवंती वसावे, नेमणुक- प्रशासन विभाग, गुन्हे शाखा यांनी केली आहे.



------0000------

पुण्य नगरी

र
र
ा
ा
ो
ो
.
ा
ा
ा
र
ा

# तीन बांगलादेशी नागरिकांवर कारवाई

**मीरा रोड** : मीरा-भाईंदर शहरात बांगला देशी नागरीकांवर पोलिस वारंवार कारवाई करत असले तरी शहरात बांगला देशी नागरिक हे बेकायदा राहत असल्याचे दिसून येत आहे. मीरा रोड पोलीस ठाणे हद्दीत वास्तव्यास असलेल्या १ पुरुष व २ बांगलादेशी महिला नागरिकांवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष मीरा-भाईंदर पथकाने कारवाई केली आहे.

सिनेमॅक्स सिनेमाजवळ, साईकृष्णा बिल्डिंगसमोर बांगलादेशी नागरिक विनापरवाना कामासाठी येत असून, ते बेकायदा राहत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष यांना मिळाली होती. त्यानुसार मंगळवारी तिथे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष मीरा-भाईंदर पथकाने सापळा रचून १ पुरुष व २ महिला अशा तीन बांगलादेशी नागरिकांना पोलिसांच्या मदतीने ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी बांगलादेशी नागरिक असल्याची कबुली दिली. त्यांच्याविरुद्ध मीरा रोड पोलीस ठाण्यात पासपोर्ट (भारतात प्रवेश) अधिनियमाच्या कलमासह विदेशी व्यक्ती अधिनियम विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Palghar Edition
Jan 23, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

# 3 Bangladeshis arrested from Mira Road for staying illegally

**SAIF ATTACK AFTERMATH**

**Suresh Golani**
MIRA-ROAD

The Mira Road police arrested three illegal immigrants from Bangladesh, including two women from the Kanakia area of Mira Road on Tuesday afternoon. Acting on a tip-off, officials raided a tenement near Cinemax Multiplex and rounded up three Bangladeshi immigrants at around 2pm. When enquired, the occupants failed to produce any legitimate documents to validate their stay in India. The trio was arrested and an offence under the relevant sections of the Foreigners Act, 1946 and Passport Act, 1950 was registered. "While efforts were on to track down those facilitating the illegal trafficking, we were also checking if more such immigrants are staying in the area," said a police official. Police inspector Devidas Handore has appealed to employers to be cautious and conduct a thorough background check before employing staff, especially domestic helpers and construction workers.

## Bandra Attack

The action was taken in the wake of the ongoing investigation into the theft and stabbing case involving actor Saif Ali Khan, who was recently attacked by an intruder Mohammad Shariful Islam alias Vijay Das, 30, from Bangladesh. The actor was stabbed multiple times in an alleged botched robbery attempt at a Bandra residence last week.